महात्मा गांधी यांचे गुरू

# नामदार
# गोपाळ कृष्ण गोखले
# जीवन-परिचय


: लेखक :

त्र्यंबक कृष्णराव टोपे

: संपादक :

मो. स. गोसावी

भा. त्र्यं. गिरधारी



V2wM66
M3
201300



गोखले एज्युकेशन सोसायटी, नासिक–५

*

"Public life must be spiritualised. Love of country must so fill the heart that all else shall appear as of little moment by its side. A fervert patriotism which rejoices at every opportunity of sacrifice for the motherland, dauntless heart which refuses to be turned back from its object by difficulty or danger, a deep faith in the purpose of providence which nothing can shake equipped with these The worker must start on his mission and reverently seek the joy which comes of spending one self in the service of one's country."

(सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटीच्या उद्देश पत्रकातील एक भाग.)

*

महात्मा गांधी यांचे गुरू

# नामदार
# गोपाळ कृष्ण गोखले
# जीवन-परिचय


: लेखक :

त्र्यंबक कृष्णराव टोपे

: संपादक :

मो. स. गोसावी

भा. त्र्यं. गिरधारी



गोखले एज्युकेशन सोसायटी, नासिक–५

☐ नामदार
गोपाळ कृष्ण गोखले
जीवन परिचय

☐ **प्रकाशक :**
डॉ. मो. स. गोसावी,
सेक्रेटरी,
गोखले एज्युकेशन सोसायटी,
नासिक – ४२२ ००५

☐ मांडणी व सजावट : भास्कर गिरधारी

☐ **प्रकाशन क्रमांक :** १४

☐ **प्रथमावृत्ती :** दिनांक २० जून, १९८३

☐ **मूल्य : बीस रुपये फक्त**

☐ © सर्व हक्क : गोखले एज्युकेशन सोसायटी


☐ **मुद्रक :**
का. गं. सोनार,
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६ सदाशिव पेठ,
पुणे – ४११ ०३०

समर्पण

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे गुरू

# न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे

यांच्या पवित्र स्मृतीस—



My concern, however, is more with the present & the future than with the past, & here I repeat that unless the old faith of the educated classes in the character & ideals of British rule is brought back, England will find on her hands before long another Ireland — many times bigger — in India. The younger generations are growing up full of what may be called Irish bitterness & the situation must fill all who believe in the peaceful progress of the country under British rule with anxious apprehensions. If India is to attain self-government within the Empire — an idea, which, to an increasing proportion of my countrymen, appears to be a vain dream, — the advance will have to be along ~~[illegible]~~ several lines more or less simultaneously. Of these in some

Facsimile of Gokhale's handwriting.

गोखले एज्युकेशन सोसायटीचे

संस्थापक-अध्यक्ष

# कै. प्राचार्य टी. ए. कुलकर्णी

# जन्मशताब्दी



जन्म : ५ सप्टेंबर, १८८२ मृत्यु : २६ जून, १९६७

।। विनम्र अभिवादन ।।

।। तव स्मरण सतत स्फुरणदायी आम्हा घडो ।।

# अनुक्रम ....


| | |
|---|---|
| संपादकीय : मो. स. गोसावी/भास्कर गिरधारी | सात |
| पुरस्कार : मा. भाऊसाहेब वर्तक | नऊ |
| लेखकाचे मनोगत : त्र्यं. कृ. टोपे | अकरा |
| प्रकरण १ ले : जीवन-परिचय | १ |
| प्रकरण २ रे : ना. गोखल्यांच्या कार्याची पार्श्वभूमी | ९ |
| प्रकरण ३ रे : कायदे मंडळात प्रवेश | १५ |
| प्रकरण ४ थे : काँग्रेसमधील कार्य | २१ |
| प्रकरण ५ वे : सुरतेच्या फाटाफुटीनंतर | २५ |
| प्रकरण ६ वे : दक्षिण आफ्रिकेतील कार्य | ३३ |
| प्रकरण ७ वे : मोर्ले-मिंटो सुधारणा आणि गोखले | ३८ |
| प्रकरण ८ वे : सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी | ४३ |
| प्रकरण ९ वे : गोखले आणि गांधी | ४५ |
| प्रकरण १० वे : एक आदर्श भारतसेवक | ४८ |
| परिशिष्ट एक : ना. गोखल्यांचे काही समकालीन | ५२ |
| परिशिष्ट दोन : काही आठवणी | ५७ |
| परिशिष्ट तीन : ना. गोखले यांची चार भाषणे | ६१ |
| परिशिष्ट चार : ना. गोखले यांच्या जीवनातील ठळक घटना | १०२ |


□ □ □

# संपादकीय....

गोखले एज्युकेशन सोसायटीने प्रतिवर्षी प्रकाशन संदर्भातील अनंत अडचणी बाजूला सारून संस्थेच्या स्वतंत्र प्रकाशनांची एक दर्जेदार आणि गौरवशाली परंपरा निर्माण केली आहे.

प्राचार्य डॉ. हे. वि. इनामदार, प्राचार्य त्र्यं. कृ. टोपे, प्राचार्य ना. गो. जोशी, प्राचार्य प्र. दा. राजदेरकर, प्राचार्य डॉ. मो. स. गोसावी, प्रा. डॉ. भास्कर गिरधारी यांचे विविध ग्रंथ आणि संपादने आजवर प्रकाशित केलेली आहेत. डॉ. म. वि. गोविलकर आणि डॉ. र. वा. बिवलकर यांच्या पीएच्. डी. पदवी व या पदवीनंतरच्या संशोधनपर ग्रंथाच्या प्रकाशनात संस्थेने सक्रीय वाटा उचलला आहे. त्यामुळे ही सारी ग्रंथ संपदा प्रकाश स्रोतात आली आहे. पीएच्. डी. चे प्रबंध आणि प्राध्यापकांच्या संशोधनाचे निष्कर्ष प्रकाशित करण्याची संस्थेची योजना म्हणजे शैक्षणिक संस्थांच्या इतिहासातील एक दुर्मिळ उदाहरण आहे. 'पीएच्. डी प्रबंध : रूपरेषा आणि निष्कर्ष' ह्या ग्रंथाचा पहिला भाग आम्ही यापूर्वी प्रसिद्ध केला असून लवकरच त्याचा दुसरा भाग प्रसिद्ध करणार आहोत. कृषी-उद्योग-कला-वाणिज्य-शिक्षण-विज्ञान या ज्ञानशाखांतील संशोधनाला वाहिलेले 'स्वंयप्रकाश' हे संस्थेचे मुखपत्र, नियतकालिक नियमतपणे कसदार साहित्याचे-शोध-निबंधांचे प्रकाशन करीत आहे.

कै. प्राचार्य टी. ए. कुलकर्णी यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. या जीवनव्रती शिक्षण तज्ज्ञाचे प्राचार्य ना. गो. जोशी यांनी लिहिलेले 'जीवनचरित्र व आठवणी सांगणारे' पुस्तक आम्ही नुकतेच प्रसिद्ध केले आहे. या वर्षातील आमचा दुसरा प्रकल्प संकल्पानुसार आता या नामदार गोखले यांच्या चरित्रग्रंथ प्रकाशनाने सिद्ध होत आहे. कै. प्राचार्य टी. ए. कुलकर्णी यांनी आपल्या संस्थेच्या स्थापनेची प्रेरणा नामदार गोखले यांच्यापासून घेतली आणि या आपल्या श्रद्धास्थानाविषयीची कृतज्ञता नव्हे त्यांचे एक चिरस्मारक म्हणून 'नामदार गोपाळ कृष्ण गोखले' यांचे नामाभिधान संस्थेला दिले. १९१८ साली स्थापन केलेल्या या शिक्षण संस्थेने 'गोखले एज्युकेशन सोसायटी' हे नाव धारण केले. तेव्हा नामदार गोखले यांच्या जीवनकार्याचा परिचय सर्वांना उपलब्ध व्हावा ही या प्रकाशनामागील भूमिका आहे.

आपल्या गोखले एज्युकेशन सोसायटीचे मान्यवर विश्वस्त, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य त्र्यं. कृ. टोपे यांना त्यांचा या क्षेत्रातील सर्वश्रुत अधिकार लक्षात घेऊन विनंती, केली त्यांनी ती तात्काळ मान्य केली, एवढेच नव्हे तर आनंदाने

आपल्या पूर्वयोजित कामांचा सर्व व्याप बाजूला सारून अवघ्या ३४ दिवसात ही स्वीकृत कामगिरी पार पाडली. अल्पावधीत हस्तलिखित हाती देऊन त्यांनी आम्हाला एक सुखद आश्चर्याचा धक्का दिला; यातून प्राचार्य टोपे यांचा संस्था आणि नामदार गोखले यांच्याविषयीचा ओतप्रोत जिव्हाळा व्यक्त झाला आहे.

आपल्या पुरस्कार लेखनाने मा. भाऊसाहेब वर्तक यांनी या ग्रंथाला पुरस्कृत करून आम्हाला उपकृत केले आहे.

आम्ही उभयतांचे कृतज्ञ आहोत.

अतिशय थोडक्या वेळात हे ग्रंथ मुद्रणाचे काम नित्याच्या परिपाठानुसार आमचे सुहृद श्री. का. गं. सोनार, लोकसंग्रह मुद्रणालय, पुणे विद्यार्थी गृह यांनी कलात्मक आणि दर्जेदार रुपात पूर्ण करून आपल्यासमोर ठेवण्याची संधी दिली त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे आम्ही ऋणी आहोत.

प्रामुख्याने नवयुवक विद्यार्थी-वर्गासमोर नामदार गोखले यांच्यासारख्या, भारताचा मानबिंदू ठरलेल्या, एका थोर देशभक्ताचे, आदर्श जीवन-चरित्र सादर करावे हा हेतू या प्रकाशनाने फलद्रूप होत आहे. ज्यांच्यासाठी हे प्रकाशन होत आहे, त्या तरुण पिढीने या चरित्राच्या अवगाहनाने व नामदार गोखले यांच्यासारख्या आदर्श, उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या दर्शनाने आपले जीवन उजळण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा. ना. गोखले यांच्या जीवन कार्याच्या मनन-चिंतनातून नवी प्रेरणा घेऊन आपले व्यक्तिगत व सार्वजनिक जीवन गंगौघाप्रमाणे पवित्र, निर्मल आणि विशुद्ध राखावे; फुलवावे अशी अपेक्षा आहे. असा प्रतिसाद प्रत्यक्षात लाभल्यास आमचे हे प्रयत्न सार्थकी लागले असे म्हणता येईल.

आम्हाला वाचकांची उत्तम दाद मिळेल याची खात्री आहे.

दिनांक : १५ जून, १९८३

**मो. स. गोसावी**
**भास्कर गिरधारी**

# पुरस्कार ....

माझे स्नेही प्राचार्य त्र्यं. कृ. टोपे यांनी खास करून युवकांसाठी संक्षिप्त स्वरूपात लिहिलेल्या नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जीवन-परिचय पुस्तकास पुरस्कार लिहिताना मला विशेष आनंद वाटत आहे. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या आजवरच्या प्रकाशन परंपरेत यामुळे मोलाची भर पडत आहे.

कै. प्राचार्य टी. ए. कुलकर्णी यांनी १९१८ साली स्थापन केलेल्या या शिक्षण संस्थेला थोर शिक्षण तज्ज्ञ, आदर्श समाज-सुधारक व महात्माजींचे राजकीय गुरू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सारख्या थोर पुरुषाचे नाव दिले. संस्थेला ज्यांचे नामाभिधान प्राप्त झाले आहे अशा थोर विभूतीचा सर्व-साधारण समाजाला व विशेष करून संस्थेतील चालक, पालक, शिक्षक व मुखत्वे-करून बालक या सर्वच घटकांना परिचय असणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टि-कोनातून प्राचार्य टोपे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. लेखनाची ही जबाबदारी प्राचार्य टोपे यांनी आनंदाने स्वीकारली आणि अवघ्या एक महिन्यात ती समर्थपणे पार पाडली ही गोष्ट खचित अभिनंदनीय आहे.

यंदाचे वर्ष हे कै. प्राचार्य टी. ए. कुलकर्णी यांचे जन्मशताब्दीचे वर्ष आहे, याच वर्षी त्यांचे श्रद्धास्थान असलेल्या ना. गोखले यांचे चरित्र प्रकाशित होत आहे हा एक मोठा सुयोग आहे.

नामदार गोखले यांचे व्यक्तिमत्त्व केन्द्रस्थानी मानून या ग्रंथाचे लेखन करतांना अवघ्या दहा प्रकरणात त्यांची समग्र जीवन गाथा येथे गोवलेली आहे. एका थोर विभूतीच्या जीवनाचा केवळ आकर्षक-मनोवेधकच नव्हे तर हृदयस्पर्शी जीवनलेख साकार करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. नामदार गोखले यांची घरची गरिबी, बालपण, शिक्षण, त्यांच्या कार्याची पार्श्वभूमी, कायदे मंडळात प्रवेश, काँग्रेसमधील कार्य, सुरते काँग्रेस फाटाफुटीनंतरची परिस्थिती दक्षिण आफ्रिकेतील कार्य, मोर्ले मिंटो सुधारणा आणि गोखले,. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, गोखले आणि गांधी, एक आदर्श भारत सेवक, इत्यादी मुद्द्यांच्या आधारे प्राचार्य टोपे यांच्या कसदार व संपन्न लेखन शैलीतून उतरलेला हा जीवन परिचय वाचकांना रुचेल अशी मला खात्री आहे.

मुंबई विद्यापीठाचे उप-कुलगुरुपद भूषविलेल्या प्राचार्य टोपे यांचा विविध विषयांचा व्यासंग फार मोठा आहे. ते आजच्या पिढीतील एक नामवंत शिक्षण-

तज्ज्ञ व न्यायप्रवृत्त मनोवृत्तीचे समाज चिंतक–विचारवंत आहेत. महाराष्ट्राच्या एकूण सर्वच सांस्कृतिक अंगांचा त्यांचा गाढा व्यासंग आहे. गोखले एज्युकेशन सोसायटीने नुकतेच त्यांचे 'स्वातंत्र्योत्तर सामाजिक आणि शैक्षणिक समस्या' या व्याख्यान–ग्रंथाचे प्रकाशन केले आहे. नामदार गोखले यांचा जीवन परिचय संक्षेपाने मांडण्याची कामगिरी मोठ्या कौशल्याने प्राचार्य टोपे यांनी पार पाडली आहे. या ग्रंथात नामदार गोखले यांचे संपूर्ण चरित्र किंवा तत्कालीन राजकीय-सामाजिक घडामोडींचा इतिहास मांडावा अशी लेखकाची भूमिका नव्हती. महात्मा गांधींचे गुरू आणि न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे शिष्योत्तम गणले गेलेल्या गोखल्यांचे आध्यात्मिक आणि विशुद्ध सार्वजनिक जीवनकार्य तरुण पिढीसमोर ठेवावे एवढ्याच भूमिकेतून लेखकाने प्रस्तुत पुस्तकाचा प्रपंच केला आहे. ग्रंथाचे हे उद्दिष्ट निश्चितच सफल झाले असून त्याची फलश्रुती तरुण पिढीने आपल्या आचार विचाररूप प्रतिसादाने प्रकट करावयाची आहे.

शेवटी, आपल्या संस्थेचे कार्यक्षम व कल्पक सेक्रेटरी प्राचार्य डॉ. मो. स. गोसावी व त्यांना सार्थ साथ देणारे एच्. पी. टी. महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. भा. व्यं. गिरधारी या संपादकद्वयांचे त्यांच्या या प्रकाशन कामगिरीबद्दल मी अभिनंदन करतो.

संस्थेच्या या प्रकाशनास मी सुयश चिंतितो.

[ **भाऊसाहेब वर्तक** ]<br>
अध्यक्ष,<br>
गोखले एज्युकेशन सोसायटी

मुंबई,<br>
दिनांक : १५ जून, १९८३

# लेखकाचे मनोगत ....

हे छोटे पुस्तक नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे संपूर्ण चरित्र नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या काळातील राजकीय व सामाजिक घडामोडींचा इतिहासही नाही. हे पुस्तक लिहिताना मी डोळ्यांपुढे ठेवला होता तो आजचा शाळेतील व महाविद्यालयातील विद्यार्थी, त्यांच्याच वयाचा तरुण व या संस्थेतील शिक्षक. गोखल्यांच्या जीवनाची थोडीशी तरी माहिती व्हावी, महात्मा गांधींसारख्या विश्ववंद्य पुरुषाने ज्यांना गुरू केले व ज्यांचे शिष्यत्व अभिमानाने सांगितले, त्या थोर पुरुषाच्या जीवनापासून आजच्या तरुण पिढीला व शिक्षकांना खूपच शिकण्यासारखे आहे, अशी माझी समजूत आहे. त्यांनी त्याप्रमाणे शिकावे व आपले सार्वजनिक जीवन शुद्ध करण्याचा प्रयत्न करावा अशी माझी तळमळ आहे.

गोखले यांच्या जीवनावर पुष्कळ पुस्तके आहेत. मी मात्र प्रामुख्याने दोन पुस्तकांच्या आधारावरच हे पुस्तक लिहिले आहे. माझे दिवंगत मित्र प्रा. नरहरपंत रघुनाथ फाटक यांचे 'आदर्श भारतसेवक' हे पुस्तक १९६६ साली प्रसिद्ध झाले. प्रा. फाटकांना, रानडे-गोखले यांच्याविषयी गाढ आदर होता. ते स्वत: आधाराशिवाय एक वाक्यही लिहीत नसत. जिज्ञासू वाचकांनी प्रा. फाटकांचे मूळ पुस्तक जरूर वाचावे अशी मी शिफारस करीन. दुसरे पुस्तक आहे इंग्रजी भाषेतले व त्याचे नाव आहे– "Gokhale the Indian Moderates and the British Raj" या ग्रंथाचे लेखक आहेत बी. आर्. नंदा. ते पुस्तक १९७७ साली प्रसिद्ध झाले आहे. या पुस्तकात खूपच नवीन माहिती आहे. मी दोन्ही ग्रंथकारांचा ऋणी आहे.

गोखल्यांची भाषणे प्रसिद्ध झालेली आहेत. उत्तम इंग्रजीचा नमुना या भाषणांत दिसतो. या भाषणांपैकी काही भाषणे परिशिष्टात दिलेली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे या भाषणांचा मराठीत अनुवाद झालेला नाही. महात्मा गांधींनी गुजराती भाषेत केलेला आहे. माझा विचार गोखल्यांच्या भाषणांचा मराठी अनुवाद करावयाचा आहे. असला अनुवाद प्रसिद्ध झाल्यावर गोखल्यांच्या विद्वत्तेची उंची, विचारसौंदर्य व तत्त्वनिष्ठा यांची प्रचीती मराठी वाचकालाही येईल असा मला विश्वास वाटतो.

या पुस्तकाच्या लेखनाला १८ मार्च, १९८३ रोजी मी सुरुवात केली व २१ एप्रिल, १९८३ रोजी मनोगत लिहून हे कार्य पुरे केले. मला इथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, या काळात मीच स्वत: एका आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेत होतो

मी पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. पण हे पुस्तक लिहितांना एका पवित्र वातावरणात काही वेळा मी तरंगत असे, हा माझा अनुभव मला इथे नमूद करावयाचा आहे.

गोखल्यांच्या इतर चरित्रांत त्यांचे व लो. टिळकांचे संबंध यावर अनेक पृष्ठें लिहिलेली सापडतात व ती आवश्यक आहेत. मी मात्र या गोष्टी वगळल्या आहेत, मला गोखले उभे करावयाचे होते, ते एक आध्यात्मिक वृत्तीचा थोर देशभक्त म्हणून व यासाठी लो. टिळकांविषयी काहीही न लिहिता, गोखल्यांचेच मी चित्र उभे केले. मात्र येथे इतिहासाचा मुळीच विपर्यास केलेला नाही. गोखल्यांचा मोठेपणा हा टिळकांच्या मोठेपणासारखा स्वयंभू आहे. त्याला कोणत्याही पार्श्वभूमीची आवश्यकत नाही. म्हणूनच म. गांधींनी गोखल्यांना गुरू केले, इतकेच नव्हे तर गोखल्यांचे वर्णन 'महात्मा', 'धर्मात्मा', अशा शब्दांनी केलेले आहे, 'महात्मा' ज्यांना महात्मा व धर्मात्मा मानतो त्या गोखल्यांच्या पवित्र जीवनाविषयी तरुण वर्गात कुतूहल निर्माण झाले. त्यातील काही तरुणांनी सार्वजनिक जीवन पवित्र करण्यासाठी व त्यात आध्यात्मिकता आणण्यासाठी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला, तर मी माझे श्रम सार्थकी लागले असे समजेन.

रामनवमी, शके १९०५
दि. २१ एप्रिल, १९८३

**त्र्यं. कृ. टोपे**